**न्यायालयीन याचिकांच्या प्रकरणी तातडीने कार्यवाही**
**<u>करण्यासाठी सदर प्रकरणे गांभिर्याने हाताळण्याबाबत</u>**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः विधी-२०१७/प्र.क्र.(२८/१७)/विधी कक्ष**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १२ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा</u> : शासन परिपत्रक, क्र.विधी-२०१७/प्र.क्र.(२८/१७)/विधी कक्ष, दि.११ ऑक्टोबर, २०१७.

<u>शुध्दीपत्रक-</u>

अवमान याचिका क्रमांक ५०/२०१७ श्री.पि.बि.पवार विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी दिनांक १०.१०.२०१७ रोजी सुनावणी दरम्यान महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने महत्वाच्या सुचना दिल्या आहेत. अवमान याचिका तातडीने निकालात काढण्यासाठी खालील पध्दत अवलंबिण्याच्या सूचना मा.प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी दिल्या आहेत . त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि. ११ऑक्टोबर, २०१७ मध्ये खालील सूचना अंतर्भूत करण्यात येत आहे.

**“मा. उच्च न्यायालय तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण व अन्य मा. न्यायालयामधील अवमान याचिका प्रकरणांमध्ये कार्यवाही करताना जिल्हा परिषदांमधील संबंधित अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयातील उप आयुक्त (आस्थापना किंवा विकास) व इतर क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी, ग्राम विकास विभागातील अधिकाऱ्यांकडून विलंब झाल्यास ज्या अधिकाऱ्याकडून विलंब झाला असेल त्याचे नाव अवमान याचिकेमध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात यावे व त्याच्या वेतनातून त्या याचिकेवर झालेला खर्च वसूल करण्यात यावा.”**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०१२१७५१२६७७२० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta
Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2017.10.12 17:55:56 +05'30'

**( असीम गुप्ता )**
सचिव (ग्रा.वि.व.पं.रा)

**प्रत,**

१) सचिव, (ग्राम विकास व पंचायत राज),ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक
२) सचिव (प्र.मं.ग्रा.स.यो), ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक.
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व सह/उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
६) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
७) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
८) कक्ष अधिकारी,माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
९) निवडनस्ती विधी कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.